# बुकगंगा.कॉम : साहित्याची गंगा जगभर पोहचविणारी संस्था

◆ श्रावणी भिडे ◆



**तंत्रज्ञान आणि अध्यात्म** याची सांगड घालत व्यक्ती विकास आणि समाजाचा विकास कसा करता येईल या विचार मंथनातून मायविश्व या संस्थेची निर्मिती झाली. व्यक्ती, कुटुंब, नातेवाईक, मित्रपरिवार, व्यावसायिक मित्र, संस्था आणि अखेरीस संपूर्ण विश्व अशी सात वर्तुळे माणसाच्या जीवनात असतात आणि या सात वर्तुळांमध्ये व्यक्ती संपर्क आणि संवाद साधत असतात. धावपळीच्या जीवनात व्यक्तीला स्वत:ला वेळ देता येण हे खूप महत्वाच. तंत्रज्ञानाचा वापर करून या सात वर्तुळांमध्ये संपर्क, संवाद, व्यवहार करीत व्यक्ती आपला वेळ वाचवू शकते आणि सकारात्मक शक्तीच्या जोरावर या वाचलेल्या वेळेचा सदुपयोग व्यक्ती स्वत:ची उन्नती करीत समृद्ध होऊ शकते, बलवान होऊ शकते. व्यक्ती स्वत: सकारात्मक झाली की त्याच्या भोवतीची वर्तुळे सकारात्मक होत समृद्ध, संपन्न होत जातात.

तंत्रज्ञानाचा वापर आणि त्याला अध्यात्मिक वृत्तीची जोड असावी आणि समाजासाठी काही करणे हे सुद्धा अध्यात्मिक स्वरूपात काम आहे ह्या विचारांनाच प्राधान्य देत मुळचे रत्नागिरी जिल्ह्यातील, साखरपा गावचे आणि सध्या अमेरिकास्थित मंदार जोगळेकर यांनी 'मायविश्व.कॉम' ची सुरूवात केली. जगभरातील लोकांना एकत्र आणण्यासाठी तसेच सामाजिक, सांस्कृतिक आणि व्यावसायिक क्षेत्रात विविध सेवा सुविधा उपलब्ध करून त्याचा फायदा अधिकाधिक लोकांना घेता यावा हाच उद्देश 'मायविश्व.कॉम' चा आहे.

२००४ साली पहिले विश्वसाहित्य संमेलन अमेरिकेत झाले. त्यावेळी अमेरिकेसारखे इंटरनेटवरून कोणतेही पुस्तक घरपोच मिळण्याची सुविधा भारतात उपलब्ध असणे गरजेचे आहे अशी चर्चा काही प्रतिथयश लेखक आणि प्रकाशकांबरोबर झाली.

**लाभले आम्हांस भाग्य बोलतो मराठी,**
**जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी,**
**धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी,**
**एवढ्यात जगात माय मानतो मराठी,**
**बोलतो मराठी ऐकतो मराठी**
**जाणतो मराठी मानतो मराठी...**

ह्या ओळी सार्थ होतील असे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन, तसेच आपल्या साहित्याचा प्रसार व प्रचार होण्याचा हेतू साध्य करण्यासाठी मायविश्व संस्थेचा एक उपक्रम म्हणून 'बुकगंगा.कॉम' ह्यासंकेतस्थळाची सुरुवात १५ ऑगस्ट २०१० रोजी केली. सर्व प्रकाशकांची सर्व पुस्तके छोट्या खेडगावापासून ते जगभरातील कानाकोपऱ्यात घरपोच मिळवण्याची सुविधा बुकगंगाने वाचकांना उपलब्ध करून दिली आहे. वाचक घरबसल्या फोनवरून वा इंटरनेटवरून मागणी करून आणि चेक, इंटरनेट बँकिंग, इ. मनी ऑर्डर, कॅश ऑन डिलीव्हरी अशा विविध स्वरूपात पैसे देऊन घरपोच पुस्तकांची मागणी नोंदवू शकतात.

२०१० साली ठाणे येथे पार पडलेल्या साहित्यसंमेलनामध्ये पुस्तके नसलेला पुस्तकांचा स्टॉल अशी प्रसिद्धी मिळालेल्या बुकगंगाच्या स्टॉलला भरघोस प्रतिसाद वाचक, लेखक आणि प्रकाशकांकडून मिळाला. पुस्तकाचं ऑनलाईन दुकान म्हणजे नक्की काय आहे? ई-बुक म्हणजे काय? ह्या विषयी सर्वांनाच उत्सुकता, कुतूहल होते. संमेलनामध्ये हजारो पुस्तके ईबुक स्वरूपात वाचकांना उपलब्ध केली होती आणि त्याला प्रचंड प्रतिसाद मिळाला. वाचकांना ई-बुक म्हणजे काय? ते कसं दिसतं? आणि ते वाचण्याचा अनुभव मिळवा म्हणून स्टॉलवर फक्त कॉम्पुटर ठेवण्यात आले होते.

कोणतेही नवीन कार्य, प्रणाली, व्यवसाय सुरु करताना साहजिकच काही प्रकाशक लेखकांनी बुकगंगाच्या उपक्रमाला सावध प्रतिसाद देण्यास सुरुवात केली. सकारात्मक, पारदर्शक व्यवहाराच्या माध्यमातून ई बुकची नवीन संकल्पना विविध लेखक, प्रकाशकांपर्यंत पोहचविण्याचा सतत प्रयत्न बुकगंगा ने सुरु ठेवला. नव्या काळाची नवी दिशा सकारात्मक दृष्टीकोनातून बघितल्यास आणि विचारविनिमय करून समस्यांवर मार्ग काढल्यास भारतीय साहित्य जगभरातील चोखंदळ वाचकांना सहजी उपलब्ध करून देता येतील ही आश्वासनात्मक भूमिका ठेऊन बुकगंगाने आपले कार्य सुरु ठेवले आणि त्याला हळूहळू प्रकाशक, लेखकांनी साथ दिली.

फक्त भारतातीलच नव्हे तर जगभरातील वाचकांना सर्व प्रकारचे साहित्य वाचावयास मिळावे म्हणून बुकगंगा सर्व पुस्तके, मासिके-ई-बुक स्वरूपात आणण्यासाठी प्रयत्नशील आहे. ह्याचे उत्तम उदाहरण म्हणजे दिवाळी अंक हे वर्षभर वाचकांना विकत घेऊन वाचता यावेत, संग्रही ठेवता यावेत यासाठी गेले ३ वर्षे बुकगंगाने दिवाळी अंक ई बुक स्वरूपात आणले. आतापर्यंत २०० पेक्षा जास्त दिवाळी अंक बुकगंगा.कॉम या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत आणि दिवसेंदिवस हा आकडा वाढतच आहे.

विकसनशील भारत आधुनिक तंत्रज्ञानात झपाट्याने प्रगती करीत आहे. मोबाईल तंत्रज्ञान खेड्यापाड्यात सहजी पोहचत आहे. मध्यमवर्गीयांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. तंत्रज्ञानाच्या किंमती झपाट्याने कमी होत आहेत. अशा आश्वासक वातावरणात भारतीय साहित्य ई बुक स्वरूपात विशेषत: शैक्षणिक क्षेत्रात पोचविणे हे क्रमप्राप्त आहे. योग्य राजकीय इच्छाशक्तीच्या जोरावर, सरकारी पातळीवर पुढाकार घेऊन साहित्याची गंगा खेडोपाड्यात पोहचविणे ही काळाची गरज आहे. स्वर्गीय पंतप्रधान राजीव गांधीच्या कारकीर्दीत अशी कॉम्पुटर क्षेत्राने झेप घेतली आणि अमेरिकेसारख्या बलाढ्य देशाच्या बरोबरीने आपले तंत्रज्ञ जगभर भारताचे नाव उज्वल करू शकले तसे नवीन राजकीय नेतृत्व मोबाईल, ईबुक च्या माध्यमातून नवीन क्रांती करेल हा विश्वास वाटतो. प्रिंट पुस्तकांच्या बरोबरीने नजीकच्या काळात ईबुकचा वाचकवर्ग स्वत:चे स्थान निर्माण करेल. प्रकाशक, लेखकांना ई बुक कडे दुर्लक्ष करून चालणार नाही ह्याची जाणीव जितकी लवकर होईल. तितकी लवकर साहित्य क्षेत्रात नवीन क्रांती उदयाला येईल.

साहित्याचा प्रचार आणि प्रसार करण्याचे ध्येय ठेऊन वाटचाल करीत असलेल्या बुकगंगाच्या कार्याचा दिवसेंदिवस विस्तारच होत आहे. भारतीय साहित्याचे गंगा ईबुक स्वरूपात जगभर पोहचविण्याच्या कार्यात प्रकाशक, लेखक आणि वाचक यांचे जे सहकार्य मिळत आहे. त्यावरून विश्वास वाटतो की ईबुकने साहित्य क्षेत्रात नांदी सुरु केली आहे.

ईबुकची पायरसी थांबविण्यासाठी बुकगंगाच्या तंत्रज्ञांनी स्वत:ची आधुनिक संगणकप्रणाली विकसित केली आहे. बुकगंगाच्या ईबुक रीडरच्या माध्यमातून वाचक कॉम्पुटर, आयपॅड, फोन अशा विविध माध्यमातून ई बुक्स वाचू शकतात.

बुकगंगाच्या अनेक प्रकल्पांपैकी एक म्हणजे 'ऑनलाई साहित्य संमेलन.' आजकाल साहित्य संमेलन म्हटलं कि संमेलनाध्यक्ष पद कोण भूषविणार? तसेच होणारा खर्च यासारख्या गोष्टींनी ती गाजतात किंवा वेळेप्रसंगी रद्द पण होतात. हे सर्व प्रश्न उद्‌भवणारच नाहीत असं आगळावेगळा प्रयत्न बुकगंगा.कॉमने गेल्या वर्षी 'ऑनलाईन साहित्य संमेलन' घडवून केला. त्यासाठी सर्व वाचक, लेखक प्रकाशक ह्या सर्वांकडूनच छान दाद मिळाली.

आजचे मोठमोठे लेखक, कवी ज्यांच्या लेखनाला सुरुवात ज्या अंकापासून झाली अशा 'वाङ्‌मयशोभा' ह्या अंकाच्या ५३ वर्षातील सर्व अंकांचे डीजीटायझेशन 'बुकगंगा.कॉम' ने करून हा खजिना सर्व वाचकांना उपलब्ध करून दिला आहे. 'बुकगंगा.कॉम'ने सुमारे १०,००० विविध विषयांवरची 'ई-बुक्स' वाचकांना उपलब्ध करून दिली आहेत.

वाचकांना उत्तमोत्तम सेवा उपलब्ध करून देण्यासाठी ७५ लोकांची टीम आमच्या येथे कार्यरत आहे. तसेच मुळचे साखरपा गावचे असणारे 'मंदार जोगळेकर' ह्यांनी सामाजिक बांधिलकी म्हणून रत्नागिरी जिल्ह्यातील त्यांच्या 'साखरपा' गावातील मुलामुलींना तंत्रज्ञानाच्या मदतीने रोजगार उपलब्ध करून दिला. सामाजिक बांधिलकी विषयी भाष्य बरेच वेळा केले जाते पण प्रत्यक्ष कृती करणारे हे फारच थोडे असतात. गावातील मुलांना अगदी शेतीची कामे सांभाळून देखील आता काम करता येऊ लागले आहे आणि त्यासाठी प्रशिक्षण देण्यासाठी पुण्यातील टीमनेही वेळोवेळी सहकार्य, मार्गदर्शन केले आहे आणि त्यामुळेच आयपॅड, ॲनरॉड फोन, लॅपटॉप, कॉम्पुटर ह्यासारख्या वर वाचता येणारी 'ई-बुक्स'

(शेवटच्या पानावर)

Free Home Delivery*
Books Available online on
BookGanga
www.bookganga.com

# बुकगंगा.कॉम : साहित्याची

साखरपा गावात आकार घेत आहेत.

बुकगंगाच्या कार्याची दखलही वेळोवेळी विविध प्रसारमाध्यमे, वृत्तपत्रे ह्यांनी घेतली आहे. बुकगंगाचे सकाळ आणि महाराष्ट्र टाईम्स मधील 'हे आवर्जून वाचा' आणि 'पुस्तकविश्व' हे सदर वाचकवर्गात खास करून लोकप्रिय आहे. मायविश्वच्या 'ग्लोबलमराठी.कॉम' ह्या संकेतस्थळावर देखील विविध पुस्तकांची माहिती वेळोवेळी दिली जाते.

जरी मायभूमीपासून दूर असलो तरी मराठीशी जुळलेली नाळ आजही कायम आहे हे वाक्य आपला सकारात्मक दृष्टीकोन, जिद्द आणि तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून श्री. मंदार जोगळेकर यांनी 'बुकगंगा.कॉम' ह्या संकेतस्थळाची निर्मिती करून सार्थ केले आहे. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी त्यांच्या सर्वच कुटुंबियांची, तसेच सहकाऱ्यांची साथ वेळोवेळी लाभली आहे आणि ह्याचा उल्लेख ते आपल्या यशाचे गुपित सांगताना नेहमी करतात.

आजपर्यंत जशी बुकगंगाची वाटचाल यशस्वीपणे चालू आहे तशीच ती पुढे चालत राहो आणि ती यशस्वी होण्यास कारणीभूत असलेला आमचा वाचकवर्ग आणि ग्राहक ह्याचे उत्तरोत्तर प्रेम असेच मिळत राहो हीच सदिच्छा.